ePaper

# ममता बॅनर्जींनी बांधली उद्धव ठाकरेंना राखी!



| वर्ष - 7 | अंक - 119 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**


- जोकोविचचे विजयी पुनरागमन!
- आलियाकडे 557 कोटींची संपत्ती!
- बसपा स्वबळावर.....
- जनतेत कोणताही संभ्रम नाही!


www.mahaenews.com | गुरुवार , दिनांक 31 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पूर्णानगर येथे अग्नितांडव!

## » चारजणांचा होरपळून मृत्यू : रक्षाबंधनाच्या दिवशीच शहरात शोककळा

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पूर्णानगर येथील जुन्या प्रादेशिक परिवहन कार्यालयाजवळील पुजा हाईट्समधील एका हार्डवेअरच्या दुकानाला पहाटे आग लागली. या घटनेची वर्दी मिळताच अग्निशमन दलाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाने त्वरीत कार्यवाही करून आग विझवली.या दुर्घटनेत राजस्थानमधील पाली जिल्ह्यातील चिमणाराव बेणाराम चौधरी(वय ४१), नम्रता चिमणाराम चौधरी ( वय ३८), भावेश चिमणाराम चौधरी ( वय १५), सचिन चिमणाराम चौधरी (वय १३) यांचा मृत्यू झाला आहे. तसेच आगीत दुकानाचे नुकसान देखील झाले आहे.**





या दुर्घटनेचे वृत्त समजताच आयुक्त शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी लगेचच घटनास्थळी भेट दिली आणि परिस्थितीचा आढावा घेतला तसेच त्यांनी यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयात मृतांच्या नातेवाईकांचीही भेट घेतली आणि त्यांचे सांत्वन केले.

घटनास्थळी पोलीस सह आयुक्त संजय शिंदे, अतिरिक्त पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त डॉ.काकासाहेब डोळे, सहाय्यक पोलीस आयुक्त पद्माकर घनवट, सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, क्षेत्रीय अधिकारी सिताराम बहुरे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, अग्निशमन अधिकारी उदय वानखेडे, हृषिकांत चिपाडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, वरिष्ठ पोलीस निरिक्षक ज्ञानेश्वर काटकर, तहसीलदार अर्चना निकम, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, अग्निशमन विभागाचे जवान, सुरक्षारक्षक उपस्थित होते.

आगीचे नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू असून पोलीस, महापालिका आणि वीज वितरण कंपनीचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे.

### आयुक्त शेखर सिंह यांच्याकडून शोक...

**» पूर्णानगर येथील दुकानास लागलेल्या आगीत ४ जणांचा दुर्दैवी मृत्यु झाला असून मृतांप्रती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी शोक व्यक्त केला आणि कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी असल्याची भावनाही त्यांनी व्यक्त केली. तसेच, भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनीही या घटनेबाबत शोक व्यक्त केला आहे.**

### आमदार महेश लांडगे घटनास्थळी...

**» भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांनी घटनास्थळी भेट दिली. शहरातील सर्व व्यापारी, नागरिक आणि व्यावसायिकांनी आपल्या आस्थापनांच्या सुरक्षेबाबत सतर्क रहावे. सण-उत्सवाचा काळ सुरू झाला आहे. त्यामुळे दुर्घटना होणार नाही, याची काळजी घ्यावी. महापालिका, अग्निशमन प्रशासनानेही सतर्क रहावे, असे आवाहनही लांडगे यांनी केले आहे.**

---

# पुणे-पिंपरी-चिंचवड सोन्याची अंडी देणारी कोंबडी!

## » 5 महिन्यांत 3 हजार कोटींचा महसूल : नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाची आकडेवारी

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चालू आर्थिक वर्षात केवळ पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरांमधून तब्बल तीन हजार कोटींचा महसूल शासनाच्या तिजोरीत जमा झाला आहे. नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने चालू आर्थिक वर्षातील पहिल्या पाच महिन्यांच्या घेतलेल्या आढाव्यात ही बाब समोर आली आहे. त्यामुळे पुणे, पिंपरी-चिंचवडकरांचा मालमत्ता खरेदी-विक्रीकडे कल असल्याचे दिसून आले आहे.**

पुरंदर येथील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळ, मेट्रो प्रकल्प, दोन वर्तुळाकार रस्ते अशा महत्वाकांक्षी प्रकल्पांसह माहिती




व तंत्रज्ञान क्षेत्र, उद्योग, रोजगाराची हमी अशा विविध घटकांमुळे पुणे, पिंपरी-चिंचवडमध्ये मालमत्ता खरेदी-विक्रीत वाढ झाल्याचे निरीक्षण नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने नोंदविले आहे.

चालू आर्थिक वर्षात पुणे, पिंपरी-चिंचवड शहरांसाठी राज्य शासनाने ८ हजार ५०० कोटी रुपयांच्या महसुलाचे उद्दिष्ट दिले आहे.

या उद्दिष्टापैकी निम्मे उद्दिष्ट पहिल्या पाच महिन्यांतच पूर्ण करण्यात नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाला यश आले आहे.

### चालू आर्थिक वर्षातील आकडेवारी...

**» चालू आर्थिक वर्षात १ एप्रिल ते आतापर्यंत पुणे, पिंपरी-चिंचवडमध्ये तब्बल एक लाख सहा हजारांपेक्षा जास्त दस्त नोंद झाले आहेत. त्यातून तीन हजार कोटींचा महसूल मिळाला आहे. एप्रिल ते जून या कालावधीत ६९ हजार ५८९ दस्त नोंद झाले. त्यातून शासनाला १ हजार ५७०.४९ कोटींचा महसूल प्राप्त झाला. जुलै महिन्यात २५ हजार २२९ दस्त नोंद होऊन ८७३.२६ कोटींचा महसूल मिळाला, तर ऑगस्ट महिन्यात आतापर्यंत २० हजारांपेक्षा जास्त दस्त नोंद होऊन सुमारे ५५० कोटींचा महसूल प्राप्त झाला आहे.**

# एक राखी आजी-माजी सैनिकांसाठी!

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सैनिक सेलचा अनोखा उपक्रम

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**सीमेवर राहून देशाचे संरक्षण करणारे जवान यांच्यामुळे आज आपण सुरक्षित आहोत याची जाणीव प्रत्येक नागरीकांना असली पाहिजे. त्यामुळे त्यांच्या प्रती नैतिक, सामाजिक, मानसिक, आणि साधनसामग्रीने बंधु आणि भगिनीभाव आपण जपला पाहिजे. या भावनेने भारतीय सैनिकांनसाठीचे पॅराप्लेजिक पुनर्वसन केंद्र खडकी कॅम्प येथे राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी सैनिक सेलच्या वतीने आजी-माजी सैनिक भावांना राखी बांधण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.**



सैनिक सेलचे मार्गदर्शक, 1971 लढाईचे युद्ध हीरो कर्नल संभाजी पाटील यांच्या मार्गदर्शना खाली तर राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी सैनिक सेलच्या राज्यप्रमुख आणि प्रदेशाध्यक्षा मेघा समीर कुलकर्णी यांच्या आयोजनातून हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाला कर्नल मुखर्जी, कर्नल समीर कुलकर्णी व सैन्यातील वरीष्ठ अधिकारी, प्रदेश सरचिटणीस बाबासाहेब जाधव, प्रदेश संघटक कप्तान वसंत आजमाने, पुणे शहराध्यक्ष अविनाश ढोले पाटील कर्नल भारगवा, स्मिता माने, हलिमा शेख, प्रतिभा नवले यांची प्रमुख उपस्थिती सोबतच आजी माजी सैनिक, वीर पत्नी, वीर नारी, शाळेचे विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वृक्षांना राखी बांधण्याचा उपक्रम

» समाजरक्षणासाठी सदैव कटिबद्ध असणारे पोलिस बांधव पर्यावरणाच्या समतोलासाठी वृक्षांना राखी बांधण्याचा अनोखा उपक्रम पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस अमित बागुल यांनी राबविला.पर्वती पोलिस स्टेशनमध्ये पोलिस बांधवांबरोबर रक्षाबंधन साजरे करण्यात आले. आम्ही सदैव तुमच्या रक्षणासाठी कटिबद्ध आहोत, अशी ग्वाही पोलिस बांधवानी यावेळी दिली.

समाजरक्षणासाठी सदैव कटिबद्ध असणारे पोलिस बांधव पर्यावरणाच्या समतोलासाठी वृक्षांना राखी बांधण्याचा अनोखा उपक्रम पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस अमित बागुल यांनी राबविला.पर्वती पोलिस स्टेशनमध्ये पोलिस बांधवांबरोबर रक्षाबंधन साजरे करण्यात आले. आम्ही सदैव तुमच्या रक्षणासाठी कटिबद्ध आहोत, अशी ग्वाही पोलिस बांधवानी यावेळी दिली. याप्रसंगी सहायक पोलिस आयुक्त सिंहगड विभाग शेवाळे साहेब, पर्वती पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जयराम पायगुडे ,गुन्हे शाखेचे निरीक्षक विजय खोमणे, सहायक फौजदार बाबा कदम व पोलिस बांधव उपस्थित होते. त्यानंतर राजीव गांधी ई -लर्निंग स्कुलसमोरील वृक्षाला राखी बांधून पर्यावरणासाठी कटिबद्ध होऊ या , वसुंधरा वाचविण्यासाठी कृतिशील होऊ याचा निर्धार केला.

# पवारांनी पंतप्रधान होण्याची संधी घालवली!

## आता त्यांनी रिटायर्ड व्हावे : पूनावालांचा सल्ला

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शरद पवार यांचं आता वय झालं आहे त्यांनी आता रिटायर्ड व्हावं असा सल्ला त्यांचे मित्र सायरस पूनावाला यांनी त्यांना दिला आहे. एवढंच नाही तर शरद पवार यांनी दोनदा पंतप्रधान होण्याची संधी घालवली आता त्यांनी आराम करावा, मी पण आरामच करतो आहे असंही सायरस पूनावाला यांनी म्हटलं आहे. सायरस पूनावाला यांनी पुण्यात पत्रकारांच्या एका प्रश्नावर उत्तर देत असताना हे वक्तव्य केलं आहे.**



### मार्गदर्शक सूचनांनुसार ही मोहीम

» राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फाटाफूट झाली आहे तरीही तुमच्या पक्षातला आश्वासक चेहरा कोण? असं जेव्हा शरद पवार यांना विचारण्यात आलं तेव्हा त्यांनी हात वर करुन शरद पवार असं उत्तर दिलं होतं. शरद पवार हे जुलै महिन्यापासूनच पक्षबांधणीला लागले आहेत. तसंच त्यांना जो निवृत्त होण्याचा सल्ला देण्यात आला तो त्यांनी मानलेला नाही. शरद पवार यांनी भाजपासह यावं यासाठी त्यांच्या मनधरणीचे प्रयत्न सुरु केले आहेत. स्वतः शरद पवारांनीच याबाबत सांगितलं होतं.

२ जुलै या दिवशी अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे एकूण ९ आमदार होते ज्यांना मंत्रिपदाची शपथ देण्यात आली. पुढे खातेवाटपातही त्यांनी स्थान दिलं गेलं. अजित पवारांनी भाजपा आणि शिवसेनेबरोबर येणं हा राष्ट्रवादी काँग्रेससाठी सर्वात मोठा धक्का ठरला. यानंतर ५ जुलै या दिवशी झालेल्या भाषणात शरद पवारांनी आता आम्हाला आशीर्वाद द्यावा आणि जबाबदारीतून मुक्त व्हावं, निवृत्त व्हावं असं अजित पवार म्हणाले होते. तर शरद पवार यांनी अजित पवारांच्या या सल्ल्यावर तसंच प्रत्युत्तर दिलं होतं. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फाटाफूट झाली आहे तरीही तुमच्या पक्षातला आश्वासक चेहरा कोण? असं जेव्हा शरद पवार यांना विचारण्यात आलं तेव्हा त्यांनी हात वर करुन शरद पवार असं उत्तर दिलं होतं. शरद पवार हे जुलै महिन्यापासूनच पक्षबांधणीला लागले आहेत. तसंच त्यांना जो निवृत्त होण्याचा सल्ला देण्यात आला तो त्यांनी मानलेला नाही. शरद पवार यांनी भाजपासह यावं यासाठी त्यांच्या मनधरणीचे प्रयत्न सुरु केले आहेत. स्वतः शरद पवारांनीच याबाबत सांगितलं होतं. आता अजित पवार यांनी जो सल्ला दिला होता तो शरद पवार यांनी मानलेला नाही. पूनावाला यांचा सल्ला शरद पवार ऐकणार का? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. सायरस पूनावाला यांनी एका कार्यक्रमानंतर पत्रकारांशी बोलत असताना शरद पवार यांना रिटायर्ड व्हा असा सल्ला दिला आहे. तसंच आपलं आता वय झालं वय झाल्यावर आपण घरी आराम केला पाहिजे असंही त्यांनी म्हटलं आहे.

# पुण्यात एटीएम मशीनमध्ये छेडछाड!

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।



एटीएम मशीनमध्ये छेडछाड करून एकाने विद्या सहकारी बँकेची 28 लाख 90 हजार 800 रुपयांची फसवणूक केली आहे. याप्रकरणी स्वप्नील भीमराव पवार (वय-36, रा. नऱ्हे गाव) यांनी विश्रामबाग पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना 8 जानेवारी ते 15 जून 2023 दरम्यान घडली आहे अशी माहिती पोलिसांनी बुधवारी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार, आरोपीने वेगवेगळा बँकेचे एटीएम कार्ड विद्यासहकारी बँकेच्या एटीएम मशीन मध्ये 626 ट्रान्सजेक्शन केले. या ट्रान्सजेक्शन दम्यान आरोपी पैसे बाहेर येतांना मशीन फ्लॅप धरून ठेवत असे आणि ते हात काढून पैसे काढून घेत असे. मशीनच्या फ्लॅप मध्ये हात घालत असल्याने मशीन मध्ये बिघाड झाल्याचा मेसेज दिसत असे.

यानंतर आरोपी त्याचा बँक मध्ये जाऊन तक्रार करायचा. एटीएम मशीनमध्ये बिघाड झाला होता. मला पैसे मिळाले नाही मात्र खात्यातून वजा झाल्याचे सांगून बँकेतून परत पैसे मिळवत असे. असे करून आरोपीने 57 लाख 95 हजार 900 रुपये बँकेची फसवणूक केली. संबंधित बँकेकडून 316 ट्रान्सजेक्शन 29 लाख 05 हजार 100 रुपये परत विद्या सहकारी बँकेला मिळाले आहेत. 310 ट्रान्सजेक्शनचे पैसे बँकेला परत मिळाले नसून बँकेची 28 लाख 90 हजार 800 रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे.

# दुकाने, गोदामांचा प्रश्न ऐरणीवर!

## » पिंपरी-चिंचवड शहरातील स्थिती : प्रशासनाकडून कठोर कारवाईची अपेक्षा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पूर्णानगरमधील आगीत चार जणांचा गुदमरून मृत्यू झाल्याने अनधिकृत दुकानांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील बहुतांशी दोन मजली दुकानाच्या पोटमाळ्यावर अनधिकृत बांधकामे करण्यात आलेली असून, पोटमाळ्याचा वापर राहण्यासाठी किंवा इतर कामासाठी केला जात आहे.**



शहरात अनेक ठिकाणी हा प्रकार पूर्णतः अनधिकृत असून, महापालिकेने ज्या कामासाठी परवाना दिलेला आहे. त्याच कामासाठी त्याचा उपयोग होणे गरजेचे आहे.

तरच अशा घटना टाळता येतील, असे पिंपरी-चिंचवड महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाचे म्हणणे आहे.

पूर्णानगर येथे बुधवारी पहाटे दुकानाला लागलेल्या आगीत दुकानाचे मालक चिमणाराम चौधरी त्यांच्या पत्नी नम्रता, मुलगा भावेश आणि सचिन यांना आपले प्राण गमवावे लागले. दोन मजली दुकानावर पोटमाळा टाकून ते दुकानाच्या वरच्या भागात राहत होते. मात्र, दुकानातून बाहेर येण्या-जाण्यासाठी एकच मार्ग होता. तर घरच्यांना वर जाण्यासाठी पार्किंगच्या बाजूने एक वेगळे शटर होते. परंतु तेही बंद होते. दुकानातील पेंटिंगच्या डब्यांमुळे व रसायनांमुळे आगीने थोड्याच वेळात तीव्र स्वरूप धारण केले.

### स्वत:च्या सुरक्षेची काळजी घ्या!

कोणताही मोठा व्यवसाय करीत असताना स्वतःच्या सुरक्षेबाबत काळजी घेणे गरजेचे आहे. आपत्कालीन स्थिती उद्भवल्यास बाहेर पडण्यासाठी दुसरा दरवाजा अथवा मोठ्या खिडकीसारखा मार्ग असणे आवश्यक आहे. तसे असते तर चौधरी कुटुंब वाचू शकले असते, असे आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

### कुदळवाडीत अशी अनेक दुकाने व गोदामे

» कुदळवाडी येथे पुढील बाजूस दुकान आणि मागे किंवा दुकानाच्या वरच्या जागेत अनेक व्यावसायिक राहण्यास आहेत. येथील भंगाराच्या गोदामात शेकडो कामगार राहतात. या गोदामांना चिंचोळा एकच मार्ग असतो. त्यामुळे तेथेही आगीची दुर्घटना घडल्यास मोठी जीवित हानी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### अनधिकृत बांधकामांचा सपाटा

» पिंपरी-चिंचवड शहरात अनेक ठिकाणी दोन मजली दुकानांमध्ये अनधिकृत बांधकाम करून किंवा पोटमाळा काढून व्यवसाय केले जातात. हा प्रकार पूर्णतः अनधिकृत असल्याचे महापालिकेच्या बांधकाम परवाना विभागाचे म्हणणे आहे.

» घर भाड्याचे पैसे वाचले जावेत, जास्तीत जास्त वेळ दुकान सुरू ठेऊन व्यवसाय करता यावा, हा त्यामागील उद्देश असतो. मात्र, व्यवसाय करताना स्वतःची सुरक्षा ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. त्याचबरोबर शहरात गुंठा अर्धा गुंठा जागा घेऊन अनधिकृत बांधकामे करण्यात आलेली आहेत. सध्या मोठ्या प्रमाणात अशी बांधकामे करण्याचा सपाटा या भागात सुरू आहे. मात्र, अर्ध्या किंवा एक गुंठ्यात चार ते पाच मजली बांधकाम करताना कोणत्याही प्रकारची खबरदारी घेतली जात नाही.

---

# पिंपरी चिंचवडमध्ये डेंग्यूचे रुग्ण वाढले!

## » एका महिन्यात हजारापेक्षा जास्त संशयित : थंडी-तापाच्या रुग्णांमध्ये मोठी वाढ

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरात थंडी-तापाच्या रुग्णांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. त्यामध्ये डेंग्यू, मलेरिया रुग्णांची भर पडत असून, पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या वाढत आहे. ऑगस्ट महिन्यामध्ये ४९ जणांना डेंग्यूची लागण झाली आहे. त्यामुळे दोन महिन्यांतील बाधितांची संख्या ८५ वर गेली आहे. या एका महिन्यात १९५१ संशयित आढळले आहेत.**




बदललेले वातावरण, त्यात डासांचा त्रास जाणवू लागल्याने संसर्गजन्य आजारांनी डोके वर काढले आहे.

शहरात डेंग्यू आजाराच्या तापाने नागरिक फणफणले आहेत. शहरात जुलै महिन्यामध्ये ३६ जणांना डेंग्यूची लागण झाली होती; तर ऑगस्ट महिन्यामध्ये ४९ जणांचा तपासणी अहवाल पॉझिटिव्ह आहे. तसेच ऑगस्ट महिन्यामध्ये १९५१ डेंग्यूचे संशयित रुग्ण आढळले आहेत. १३ हजार ७१२ रुग्णांना तीव्र थंडीताप असून सहाजणांना मलेरियाची लागण झाली आहे. पावसाळा सुरू झाला की, अनेक ठिकाणी पाण्याची डबकी तयार होतात. गटार, नाले यांची पावसाळ्यापूर्वी स्वच्छता केली न गेल्यास पाणी साचले जाते. घराचा परिसर स्वच्छ न केल्यास परिसरात पाणी साचून यामध्ये डेंग्यूच्या डासांची पैदास होत असते. त्यामुळे पावसाळ्यामध्ये संसर्गजन्य आजारांमध्ये वाढ होते. शहरातील नागरिकांना त्याचा फटका बसत असून डेंग्यू व मलेरियाची साथ बळावत आहे.

### डेंग्यूची लक्षणे

**» डेंग्यूचे मच्छर चावल्याने व्यक्ती आजारी पडण्यास सुरुवात होते. व्यक्तीला १०१ अंश सेल्सिअस ताप येतो. खोकला, घसा खवखवणे, अशक्तपणा, शरीरातील पाणी कमी होणे, बीपी कमी होणे, सफेद पेशी कमी होणे ही डेंग्यूची लक्षणे आहेत. तसेच मलेरिया झाल्यावरदेखील ही लक्षणे आढळतात.**

### ... अशी आहे आकडेवारी

| महिना | ताप | मलेरिया | डेंग्यू | संशयित | डेंग्यू पॉझिटिव्ह |
|---|---|---|---|---|---|
| जून | १० | १०० | ०५ | ४७२ | ०० |
| जुलै | १३ | ८५५ | ०० | १४३२ | ३६ |
| ऑगस्ट | १३७ | १२ | ०६ | १९५१ | ४९ |

“ डेंग्यू, मलेरियाचे रुग्ण वाढत असले तरी गंभीर रुग्णांची संख्या कमी आहे. नागरिकांनी आपल्या परिसरात डासांची पैदास होणार नाही, याची काळजी घ्यावी. तसेच थंडी, ताप, खोकला अशी डेंग्यूची लक्षणे आढळल्यास त्वरित नजीकच्या महापालिकेच्या रुग्णालयात तपासणी करून घ्यावी.

- **डॉ. लक्ष्मण गोफणे,** आरोग्य वैद्यकीय अधिकारी.




# यातच नीरजचे असाधारणपण!

**ऑलिम्पिकप्रमाणेच नीरज चोप्राने भालाफेक या प्रकारात परवा जागतिक सुवर्णपदकही जिंकले. ऑलिम्पिक, जागतिक, आशियाई आणि राष्ट्रकुल अशा स्पर्धांमध्ये सुवर्णपदक जिंकलेल्या दुर्मिळातील दुर्मीळ खेळाडूंमध्ये त्याची गणना होईल. वास्तविक यांतील पहिली दोन सुवर्णपदके जिंकणे ही अतिशय खडतर बाब.**

भालाफेकीत तर ऑलिम्पिक आणि जागतिक सुवर्णपदक जिंकलेले नीरजव्यतिरिक्त आणखी दोनच अॅथलीट आहेत. याचे कौतुक तर आहेच. पण हे सगळे नीरजकडून अतिशय सहजपणे घडून आल्यासारखे वाटते आणि हे त्याचे वर्चस्व थक्क करणारेच ठरते. प्रकाश पडुकोण, विश्वनाथन आनंद, पी. व्ही. सिंधू यांच्याप्रमाणे एकापेक्षा अधिक अजिंक्यपदे महत्त्वाच्या स्पर्धांमध्ये जिंकणाऱ्या भारतीय खेळाडूंच्या छोट्याशा गटातही त्याचे स्थान आणि पान मानाचे राहील. हे मासले खेळाडू म्हणून त्याची उंची दर्शवणारे ठरतात. त्याविषयी कौतुक आहेच. पण जगज्जेतेपद पटकावल्यानंतर पदकविजेत्यांच्या सत्कारसोहळ्याच्या वेळी त्याने या स्पर्धेतील उपविजेता, पाकिस्तानच्या अर्शद नदीमला जवळ बोलावून घेतले. अर्शदकडे पाकिस्तानी ध्वज नव्हता, तेव्हा त्याला आपल्या तिरंग्यामध्ये कवटाळून नीरज त्याच्यासह



छायाचित्रकारांना सामोरा गेला. ही कृती माणूस म्हणून त्याची उंची दर्शवते! अर्शद हा नीरजच्या प्रमुख प्रतिस्पर्ध्यांपैकी एक. एरवी भारत-पाकिस्तान ही चुरस अॅथलेटिक्सच्या मैदानावर दिसण्याची शक्यता एक टक्काच. तशातही सध्याच्या ‘पाकिस्तान्याला फायनलमध्ये हरवल्या’बद्दल जल्लोषसंदेश पेरल्या जाण्याच्या वातावरणात नीरजची ही कृती विशेष लक्षवेधक ठरते. त्याच्यासाठी अर्शद नदीम पाकिस्तानी नाही, आणि स्पर्धा संपल्यानंतर प्रतिस्पर्धीही नाही. तो आहे केवळ एक सह-क्रीडापटू, ज्याच्याविषयी आदर आणि मैत्री असण्यात काहीच गैर नाही ही नीरजची भावना. क्रीडामैदानाबाहेरही त्याच्या प्रांजळ आणि सहज स्पष्टवक्तेपणातून त्याची वैचारिक खोली स्पष्ट होते. त्याच्या विधानांमध्ये रोकडे ग्रामीण शहाणपण असते. महिला कुस्तीपटूंवर झालेल्या लाठीहल्ल्याविषयी त्याने खेद व्यक्त केला होता. टोक्यो ऑलिम्पिकच्या अंतिम फेरीत त्याचा भाला नदीमने ‘चोरल्या’च्या वृत्ताचा आणि त्यावरून समाजमाध्यमांत उडालेल्या वादळाचाही त्याने रोखठोक शब्दांत समाचार घेतला होता. एखाद्या मुद्द्यावर भूमिका घ्यावी वा न घ्यावी हा पर्याय साहित्यिक, कलाकार, चित्रपटकार यांच्याप्रमाणेच क्रीडापटूंसमोरही खुला असतो. खरे तर या लोकशाही देशातील कोणत्याही जबाबदार नागरिकाचा तो घटनादत्त अधिकार आहे. पण हुजऱ्या-मुजऱ्यांच्या भाऊगर्दीत आणि कोलाहलात या अधिकाराचा एक तर विसर पडतो किंवा तो सोयिस्करपणे विसरला जातोही! तसा तो न विसरणाऱ्या मोजक्या क्रीडापटूंमध्येही नीरज चोप्राचे नाव अग्रणी आहे. तो आज जितक्या साधेपणाने पुरस्कर्त्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या कार्यालयांत जाऊन तेथील उच्चशिक्षित कर्मचारी-अधिकारी वर्गाशी बोलतो, तितक्याच निरलसपणे एखाद्या आडगावच्या शाळेत जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधतो. वलयांकित क्रीडापटूंच्या बाबतीत असा संवाद आणि समाजाशी जोडलेले असणे हल्ली दुर्मीळ बनले आहे. नीरज चोप्रा बहुतेक वेळा परदेशात सराव करतो. पण आजही हरयाणवी धाटणीचे इंग्रजी बोलण्यात त्याला कमीपणा वाटत नाही. ही निर्विष मानसिकताच बहुधा मैदानावर त्याची ताकद ठरत असावी. गेल्या काही दिवसांमध्ये जागतिक पातळीवर भारतीय क्रीडापटू चमकलेले दिसून आले. गतसप्ताहाच्या अखेरीस प्रज्ञानंद बुद्धिबळाच्या पटावर हुकूमत गाजवत होता आणि त्याने विश्वचषक स्पर्धेत रौप्यपदक जिंकले. त्याच वेळी जागतिक बॅडमिंटन स्पर्धेत प्रणय एच. एस.ने कांस्यपदक जिंकताना जगातील अव्वल मानांकित बॅडमिंटनपटूला अस्मान दाखवले. जागतिक अॅथलेटिक्समध्ये भालाफेकीत नीरजने सुवर्णपदक जिंकले, त्यावेळी अंतिम फेरीत त्याच्यासह आणखी दोघे भारतीय खेळाडू होते ही बाब कमी नवलाईची नाही. भारताचा ४ बाय ४०० मीटर्स रिले चमू अंतिम फेरीपर्यंत धडकला, हेही कौतुकास्पद. ही प्रगती सातत्यपूर्ण नाही आणि अजून बरीच मजल मारायची आहे. पण जागतिक म्हणवणाऱ्या जाणाऱ्या खेळांमध्ये भारतीय मोठ्या संख्येने नसले, तरी अव्वल स्थानांवर दिसू चमकू लागले.

## संपादकीय »

## पालक की मारक?

***आपण उद्याच्या या नागरिकांसाठी किती आणि कोणत्या संधी उपलब्ध करून देत आहोत या प्रश्नाच्या उत्तरात विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे कारण दडलेले आहे.***


आज स्त्रिया आणि पददलित यांच्याखेरीज वा त्यांच्या बरोबरीने भारतात सर्वात केविलवाणी अशी कोणती जमात असेल तर ती म्हणजे विद्यार्थी. यात शालेय आणि महाविद्यालयीन दोन्हीही येतात.

भारतीय विद्यार्थ्यांची इतकी कणव येते की त्यांच्याकडे पाहिल्यावर खाटीकखान्याकडे निघालेले प्राणीही यांच्या मानाने आनंदी वाटतात. आधी अभ्यासक्रमांचे घोळ, नंतर परीक्षा घ्याव्यात की न घ्याव्यात यावर चर्चा आणि परिसंवाद, परीक्षा झाल्याच तर उत्तरपत्रिका तपासणारे ऐन वेळी संपावर जाणारच नाहीत याची हमी नाही. शिवाय पेपरफुटीचा धोका आहेच. त्यामुळे एखादा पेपर फुटणे आणि त्या विषयाची परीक्षा दोन महिन्यांनी ठरवली जाणे ओघाने आलेच. म्हणजे परीक्षेनंतर काही कार्यक्रम ठरवायची अडचण. अलीकडे बरेच विद्यार्थी परीक्षेनंतरही दुसऱ्या कोणत्या तरी परीक्षेसच सामोरे जात असतात.

**सध्या सुरू असलेल्या आमच्या निर्माण उपक्रमाच्या पुढील बॅचच्या निवडप्रक्रियेसाठी भारतभरातून युवक-युवती अर्ज पाठवत आहेत. समाजपरिवर्तनासाठी सहभाग नोंदवण्याची, प्रसंगी झोकून द्यायची त्यांची भावनिक प्रेरणा अतिशय उत्तम आहे. मात्र या मार्गावर लांब पल्ल्यात टिकायचे असल्यास आणि तात्कालिक यशापयशाने भुलून वा खचून जायचे नसल्यास काही एक वैचारिक स्पष्टता व आधार आवश्यक आहे. ‘मी सध्या जे करतोय**

# सामाजिक कार्याची स्पष्टता !

सुप्रसिद्ध अमेरिकन व्यवस्थापनतज्ज्ञ पीटर ड्रकर यांचे ‘मॅनेजिंग द नॉन प्रॉफिट ऑर्गनायझेशन’ हे एक अतिशय सुंदर पुस्तक आहे. त्यात ते असे म्हणतात की शासकीय क्षेत्राची प्रमुख भूमिका म्हणजे समाजाला सुरळीतपणे कार्य करण्यास सुकर व्हावे यासाठीचे विविध कायदेकानू, धोरणे व नियम बनवणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे. खासगी क्षेत्राचे मुख्य काम म्हणजे लोकांना आवश्यक असलेल्या वेगवेगळ्या वस्तू आणि सेवा उत्पादित व वितरित करणे. मग सामाजिक क्षेत्राचे मुख्य काम काय? पीटर ड्रकर असे म्हणतात की ‘चेंज्ड ह्यूमन बीइंग्स’ म्हणजेच ‘माणसे घडवणे’ ही सामाजिक क्षेत्राची प्राथमिक भूमिका आहे. व्यक्तीचा विकास होतो आहे की नाही, त्या व्यक्तीच्या अंतरंगात व बाह्य जीवनात, वर्तनात बदल होत आहे की नाही यावरून सामाजिक कार्याचे आणि त्याच्या परिणामकारकतेचे मोजमाप केले जाईल, करायला हवे. यामुळे सामाजिक



क्षेत्राची भूमिका एकाच वेळी अतिशय रोमांचक आणि आव्हानात्मक अशी बनते. या व्यापक भूमिकेला अनुसरून मग प्रत्यक्ष कृतीच्या पातळीवर सामाजिक क्षेत्राची नेमकी व्याप्ती काय, कामाचे ठोस प्रकार व त्याचे विविध पैलू काय याविषयी मी एक सहामितीय रचना सुचवतो. सत्तेचा असमतोल आणि विषमता दूर करण्याच्या उद्देशाने व्यक्तींना सक्षम करणे आणि विकेंद्रीकरणाच्या व लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेला बळकट करणे हे सामाजिक क्षेत्राचे अत्यावश्यक कार्य आहे. इंग्रजीतील ‘एम्पॉवर’ हा शब्द बघा, ‘पॉवर’पासून आलेला आहे. खासगी क्षेत्राकडे आर्थिक पॉवर आहे. शासकीय क्षेत्राकडे राजकीय, नोकरशाही, दंडशक्ती आणि संसाधन वाटपाची पॉवर आहे. सहसा असे दिसेल की ही दोन्ही क्षेत्रे त्या सत्तेला घट्ट पकडून ठेवतात. नागरिकांनी निव्वळ मतदार, योजनांचे लाभार्थी, ग्राहक किंवा नोकर बनून राहावे, बाकीची सत्ता अधिकाधिक प्रमाणात स्वत:च्या हातात केंद्रित व्हावी अशी मानसिकता सरकारी व खासगी क्षेत्रांत सहसा दिसते. हे शक्तीचे असंतुलन दूर करून लोकांना सक्षम करणे, जेणेकरून ते स्वत: त्यांचे प्रश्न सोडवू शकतील आणि स्वत:च्या जीवनाचे सुकाणू हातात घेऊ शकतील, असे काम हे सामाजिक क्षेत्राचा आत्मा आहे. नुसतीच सेवा केली पण लांब पल्ल्यातही समोरची व्यक्ती स्वत:च्या पायावर उभी राहण्यास स्वतंत्र झाली नाही तर ती सेवा तर निव्वळ सामाजिक क्षेत्राची ‘रोजगार हमी योजना’ होईल. लोकांना आत्मनिर्भर होण्यास मदत करणे, त्यांच्यातल्या अव्यक्त सामर्थ्याला पूर्णत्वाने बहरता येणे, आणि याद्वारे विकसित, स्वायत्त आणि जागरूक ‘चेंज्ड ह्यूमन बीइंग’ घडवणे हे सामाजिक क्षेत्राच्या अस्तित्वाचा गाभा आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# जनतेत कोणताही संभ्रम नाही!

## » आता सरकार गॅस मोफतही देईल : उद्धव ठाकरे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उद्या मुंबईत विरोधकांच्या इंडिया आघाडीची बैठक होणार आहे. यासाठी देशभरातील प्रमुख विरोधी पक्षांच्या नेत्यांनी मुंबईत डेरा टाकण्यास सुरुवात केली आहे. अवघ्या देशाच्या नजरा या बैठकीकडे लागल्या आहेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, अशोक चव्हाण, सुप्रिया सुळे, संजय राऊत यांची बुधवारी एक संयुक्त पत्रकार परिषद झाली.**




त्यात या नेत्यांनी विरोधकांच्या बैठकीची रुपरेषा सादर करत केंद्राच्या स्वयंपाकाच्या गॅसचे दर कमी करण्याच्या निर्णयाचा खरपूस समाचार घेतला. या शिवाय राहुल गांधी, अखिलेश यादव, मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्यासह अनेक मोठे नेते मुंबईत इंडिया आघाडीच्या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. एकूण 28 पक्षाचे नेते या बैठकीला उपस्थित राहणार असल्याची माहिती संजय राऊत यांनी दिली आहे.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले की, आंबेडकरांच्या वंचितसोबत आमची युती आहे. इंडियात येण्याची प्रकाश आंबेडकरांची इच्छा आहे का हे विचारावे लागेल. उद्धव ठाकरे यांनी यावेळी आमची प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वातील वंचित बहुजन आघाडीशी युती असल्याचेही स्पष्ट केले. आमची प्रकाश आंबडेकरांच्या वंचितशी युती आहे. त्यांना इंडिया आघाडीत त्यांना घेण्याच्या मुद्यावर चर्चा जाईल. पण त्यांची या आघाडीत येण्याची इच्छा आहे का, ते विचारावे लागेल. केंद्राच्या गॅसच्या दरात 200 रुपयांची कपात करण्याच्या निर्णयावरही उद्धव ठाकरे यांनी यावेळी निशाणा साधला. विरोधकांच्या वाढत्या ताकदीमुळे केंद्र सरकार गॅसवर गेले आहे. इंडिया आघाडीची ताकद वाढेल, तेव्हा हे सरकार गॅसही मोफत देईल, असे ते म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनीही यावेळी जनतेला देशात परिवर्तन हवे असल्याचे स्पष्ट केले.

जनतेला देशात परिवर्तन हवे आहे. अनेक राज्यांतून आम्हाला म्हणजे इंडिया आघाडीला चांगला प्रतिसाद मिळत आहे. इंडियाच्या मुंबईतील बैठकीला 28 पक्ष व त्यांचे प्रतिनिधी हजर राहणार आहेत. मायावतीचा भाजपशी ही सुसंवाद सुरू आहे, लोकांना देशात परिवर्तन हवे आहे, अनेक राज्यातून आम्हाला प्रतिसाद मिळत आहे, असे पवारांनी म्हटले आहे. माजी मुख्यमंत्री तथा काँग्रेस नेते अशोक चव्हाण म्हणाले की, जसे आपण आपल्या बहिनीचे रक्षण करतो तसेच देशाचे रक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे. आम्ही सर्व पक्षाचे लोक या बैठकीसाठी तयारी करत आहोत. इंडिया आघाडीत आता 28 राजकीय पक्ष एकत्र आले आहेत. शाहू फुले आंबेडकर यांची विचारधारा टीकवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, आम्ही ही विचारधारा पुढे घेऊन जाणार आहोत. असे मतही माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी व्यक्त केले आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, अरुणाचल प्रदेशमध्ये चीन घुसलाय जसे इंडिया पुढे जाईल तसे चीन मागे हटेल. आम्ही आलेल्या सर्व नेत्यांचे महाराष्ट्रीयन पद्धतीने स्वागत करणार आहोत, अशी माहिती देखील त्यांनी यावेळी दिली आहे.

### जनतेला देशात परिवर्तन हवे

» राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनीही यावेळी जनतेला देशात परिवर्तन हवे असल्याचे स्पष्ट केले. जनतेला देशात परिवर्तन हवे आहे. अनेक राज्यांतून आम्हाला म्हणजे इंडिया आघाडीला चांगला प्रतिसाद मिळत आहे. इंडियाच्या मुंबईतील बैठकीला 28 पक्ष व त्यांचे प्रतिनिधी हजर राहणार आहेत. मायावतीचा भाजपशी ही सुसंवाद सुरू आहे, लोकांना देशात परिवर्तन हवे आहे, अनेक राज्यातून आम्हाला प्रतिसाद मिळत आहे, असे पवारांनी म्हटले आहे.

# ब्रह्मदेव खाली आले तरी मी मंत्रिपद घेणार नाही!

## » महायुतीच्या बैठकीचे निमंत्रण आले आहे : बच्चू कडू

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मंत्री पदापेक्षा मला मंत्रालय भेटले. दिव्यांगण मंत्रालय भेटले, मंत्रिपदापेक्षा जास्त भेटले. आम्ही मागितलेला एक डोळा आणि आम्हाला मिळाले दोन डोळे. मला मंत्रीपदाची गरज नाही. मी मंत्रीपदाचा दावा सोडलेला आहे. 2024 पर्यंत ब्रह्मदेव खाली आला तरी मी मंत्रिपद घेणार नाही, असे वक्तव्य अमादार बच्चू कडू यांनी म्हटले आहे.**

दरम्यान, बच्चू कडू पुढे बोलताना म्हणाले की, माझे ठाण्याला दिव्यांग अभियान आहे. त्यामुळे मी जाऊ शकणार नाही. आमचे अभियान सर्वात मोठे, सामान्य लोकांसाठी आहे. त्याचे स्थान सोडून बैठकीसाठी जाणे चांगले नाही. महायुतीची 1 तारखेला महायुतीची बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकीचे आपल्यालाही निमंत्रण आले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कारखान्यांवर घातलेल्या अटी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रद्द करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. यावर बच्चू कडून म्हणाले की, एकत्रित सरकार आहे. काही



गोष्टी एकत्रित नसताना घेतलेले निर्णय आणि आता एकत्रित आल्यावर घेतलेले निर्णय, त्याच्यातला हा निर्णय आहे. बच्चू कडू पुढे बोलताना म्हणाले की, स्पर्धा परीक्षेबाबत पेपर फुटीचा कायदा झाला पाहिजे. शेतीला भाव नाही. शेतकऱ्यांच्या मुलाला वावही नसेल, त्यात पेपर फुटी होत असेल तर कडक कायदा करण्याची आवश्यकता आहे. या प्रकरणात सरकार बदनाम होते. पेपर फुटीचा कायदा इतका कडक झाला पाहिजेल की मृत्यू दंड होतो, त्याप्रमाणे त्याच्यावर दंड झाला पाहिजे. चाकूने मारलेला माणूस दिसतो. मात्र परीक्षेने मारलेला माणूस दिसत नाही. ज्याला 50 टक्के गुण घेण्याची लायकी नसते तो पास होतो आणि 99 टक्के घेणारा नापास होतो. त्यामुळे हा मोठा खूनच आहे. त्याला त्याच पद्धतीने शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी बच्चू कडू यांनी केली. भ्रष्टाचार मुक्त होणे गरजेचे आहे. आरोग्य, शिक्षण, परीक्षा भरती याचा ताळमेळ राखला पाहिजे.

### एकत्रित आल्यावरचा निर्णय

» उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कारखान्यांवर घातलेल्या अटी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रद्द करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. यावर बच्चू कडून म्हणाले की, एकत्रित सरकार आहे. काही गोष्टी एकत्रित नसताना घेतलेले निर्णय आणि आता एकत्रित आल्यावर घेतलेले निर्णय, त्याच्यातला हा निर्णय आहे.

# बसपा लोकसभा-विधानसभा निवडणुका स्वबळावर लढवणार!

## » कोणाशीही युती नाही; आघाडीच्या बैठकीआधी घोषणा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**या वर्षी होणाऱ्या 5 राज्यांच्या विधानसभा आणि 2024च्या लोकसभा निवडणुकीत बहुजन समाज पक्ष (BSP) एकट्याने लढणार आहे. उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री आणि पक्षाच्या सुप्रीमो मायावती यांनी बुधवारी ही घोषणा केली. मुंबईतील बैठकीपूर्वी विरोधकांनी मायावती यांच्याशी नव्या महाआघाडीत सामील होण्यासाठी संपर्क साधल्याची चर्चा होती.**

मुंबईतील विरोधी आघाडीच्या बैठकीच्या एक दिवस आधी मायावती म्हणाल्या- NDA आणि INDIA युती हे बहुतांशी गरीबविरोधी, जातीयवादी, धनिकांचे समर्थक आणि भांडवलदार धोरणे असलेले पक्ष आहेत. ज्यांच्या धोरणांविरोधात बसपा लढत आहे. त्यामुळेच त्यांच्याशी युती करून निवडणूक लढवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. मायावती पुढे लिहितात- बसपा 2007 प्रमाणे लोकसभा आणि विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुका एकट्याने लढवणार असून विरोधकांच्या चालीरीतींऐवजी परस्पर बंधुभावाच्या आधारे कोट्यवधी उपेक्षित आणि तुटलेल्या समाजाला एकत्र करून एकट्याने लढणार आहे. माध्यमांनी पुन्हा पुन्हा गैरसमज पसरवू नयेत. यापूर्वी 23 ऑगस्ट रोजीही मायावतींनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे युती न करण्याचे जाहीर केले होते. बसपा प्रमुख मायावती यांनी मंगळवारी इम्रान मसूद यांची पक्षातून हकालपट्टी केली. त्याच्यावर अनुशासनहीनतेचा आरोप आहे. मायावती बुधवारी म्हणाल्या - बसपमधून हकालपट्टी केल्यानंतर




### 31 ऑगस्ट रोजी मुंबईत इंडियाची बैठक

» विरोधी पक्षांच्या युतीची भारत अर्थात भारतीय राष्ट्रीय विकास समावेशक आघाडीची तिसरी बैठक 31 ऑगस्ट आणि 1 सप्टेंबर रोजी मुंबईत होणार आहे. या बैठकीत युतीच्या समन्वयकांची घोषणा होणार आहे. याशिवाय, सार्वत्रिक निवडणुकीसाठी सामील असलेल्या सर्व पक्षांमध्ये समन्वय समितीची स्थापना आणि संभाव्य जागावाटप फॉर्म्युला यावरही चर्चा होऊ शकते.

सहारनपूरचे माजी आमदार काँग्रेस आणि त्या पक्षाच्या प्रमुख नेत्यांचे कौतुक करण्यात व्यग्र आहेत, त्यामुळे त्यांनी हा पक्ष का सोडला, असा प्रश्न लोकांना पडणे स्वाभाविक आहे. मग दुसऱ्या पक्षात का गेलात? अशा लोकांवर जनता कशी विश्वास ठेवणार? मायावतींनी लिहिले - इथे सगळे बसपासोबत युती करण्यास उत्सुक आहेत, दुसरीकडे भाजपशी मिलीभगत असल्याचा आरोप करतात. जर तुम्ही त्यांना भेटलात तर तुम्ही धर्मनिरपेक्ष आहात... तुम्ही त्यांना भेटला नाही तर तुम्ही भाजपचे आहात. हे अत्यंत अन्यायकारक आहे आणि तुम्हाला द्राक्षे मिळाली तर ठीक आहे... नाहीतर द्राक्षे आंबट आहेत, या म्हणीप्रमाणे. विरोधी पक्षांच्या युतीची भारत अर्थात भारतीय राष्ट्रीय विकास समावेशक आघाडीची तिसरी बैठक 31 ऑगस्ट आणि 1 सप्टेंबर रोजी मुंबईत होणार आहे.

या बैठकीत युतीच्या समन्वयकांची घोषणा होणार आहे. याशिवाय, सार्वत्रिक निवडणुकीसाठी सामील असलेल्या सर्व पक्षांमध्ये समन्वय समितीची स्थापना आणि संभाव्य जागावाटप फॉर्म्युला यावरही चर्चा होऊ शकते. मुंबईत होणाऱ्या भारताच्या तिसऱ्या बैठकीत 26 पक्षांचे सुमारे 80 नेते उपस्थित राहण्याची शक्यता आहे. पीटीआय या वृत्तसंस्थेनुसार, मुंबईच्या बैठकीत INDIA अलायन्सचा लोगो जारी केला जाऊ शकतो. 23 जून रोजी पाटणा येथे भारताची पहिली बैठक झाली. दुसरी बैठक 17-18 जुलै रोजी बंगळुरू येथे झाली. विरोधी पक्षांच्या एकजुटीच्या दुसऱ्या बैठकीत बंगळुरूमध्ये विरोधी पक्षांच्या आघाडीचे नाव इंडिया असे ठरवण्यात आले आहे. इंडियन नॅशनल डेव्हलपमेंटल इन्क्लुसिव्ह अलायन्स हे त्याचे पूर्ण रूप आहे. विरोधी पक्षांच्या पत्रकार परिषदेत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी ही घोषणा केली. ते म्हणाले- समन्वयासाठी लवकरच 11 सदस्यांची समिती आणि एक कार्यालय स्थापन करण्यात येईल. मुंबईत होणाऱ्या आमच्या पुढील बैठकीत त्याची घोषणा केली जाईल.

# बिहारमध्ये रक्षाबंधन, जन्माष्टमीच्या सुट्या रद्द !

## » हिंदू सणांवर बंदी घालण्याची शक्यता : गिरिराज सिंह

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बिहार सरकारने शाळांच्या सुट्या कमी केल्या आहेत. रक्षाबंधन, हरितालिका तीज, जिउतिया, विश्वकर्मा पूजा, श्रीकृष्ण जन्माष्टमी, गुरु नानक जयंती या सणांना सुटी नसेल. मंगळवारी रात्री उशिरा शिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव के. के. पाठक यांनी हा आदेश जारी केला.**

भाजप खासदार गिरिराज सिंह म्हणाले, 'बिहार सरकारने दुर्गा पूजा, दिवाळी आणि छठपूजेच्या सुट्या रद्द केल्या आहेत. उद्या चालून बिहारमध्ये शरियाही लागू होईल आणि हिंदू सण साजरे करण्यावर बंदी घातली जाण्याची शक्यता आहे. 28 ऑगस्ट ते 31 डिसेंबरपर्यंत सरकारी शाळांना सुमारे 23 सुट्ट्या होत्या, त्या कमी करून 11 करण्यात आल्या आहेत. आतापर्यंत दिवाळीपासून छठपूजेपर्यंत सलग सुट्ट्या होत्या. शिक्षण विभागाने 9 दिवसांची रजा केवळ 4 दिवसांवर आणली आहे. आता दिवाळी, चित्रगुप्त पूजा (भाऊबीज) आणि छठसाठी 2 दिवस सुटी असेल. सुट्ट्यांमध्ये



केलेल्या बदलांबाबत, शिक्षण विभागाचे म्हणणे आहे की, हक्क कायदा 2009 अंतर्गत, प्राथमिक शाळांमध्ये (इयत्ता 1-5) किमान 200 दिवस, माध्यमिक शाळांमध्ये (इयत्ता 6-8) किमान 220 दिवस कार्यरत असणे आवश्यक आहे. माध्यमिक शिक्षण विभागाचे संचालक म्हणाले की, निवडणुका, परीक्षा, सण, नैसर्गिक आपत्ती यामुळे शाळांमधील शिक्षणावर परिणाम होतो. यासोबतच सणासुदीच्या निमित्ताने शाळा बंद ठेवण्याच्या प्रक्रियेतही एकसूत्रता नाही. काही सणांच्या काळात काही जिल्ह्यांमध्ये शाळा सुरू असतात तर काहींमध्ये बंद असतात. हा बदल 2023 च्या उर्वरित दिवसांसाठी केवळ शाळांच्या कामकाजात एकसमानता येण्यासाठी करण्यात आला आहे. मध्यवर्ती अश्विनी चौबे यांनी ट्विट करून लिहिले की, काका-पुतण्याच्या अहंकारी आघाडी सरकारने बिहारमधील हिंदू तीज सणाच्या सुट्ट्या रद्द

### मुख्यमंत्र्यांनी हस्तक्षेप करावा

» शिक्षण विभागाच्या या आदेशानंतर शिक्षकही संतप्त झाले आहेत. टीईटी प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य संयोजक राजू सिंह म्हणतात, 'सर्व नियम आणि अटी लक्षात घेऊन हा आदेश जारी करण्यात आला आहे. अशा सूचनांद्वारे शिक्षकांना त्रास देण्याचे काम केले जात आहे. मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी याप्रकरणी हस्तक्षेप करण्याची मागणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले, अन्यथा शिक्षक न्यायालयात दाद मागतील.

करून आपली स्वस्त मानसिकता दाखवली आहे. एका विशिष्ट वर्गाला खुश करण्यासाठी काका-पुतण्या सरकारने असे पाऊल उचलले आहे. यावरून बिहार सरकारची हिंदुविरोधी मानसिकता दिसून येते, असे सुशील मोदी म्हणाले. रक्षाबंधन आणि तीजचा सण संपवून तुम्हाला काय संदेश द्यायचा आहे? छठची सुट्टी 2 दिवसांची करण्यात आली. हे अत्यंत आक्षेपार्ह आहे. त्यामुळे हिंदू समाजाच्या श्रद्धेला तडा गेला. हा आदेश तात्काळ मागे घेण्यात यावा.

# बॉबीला मिळाल्या नाहीत क्षमतेप्रमाणे भूमिका



सनी देओलच्या मते त्याचा भाऊ बॉबी देओलला त्याच्या टॅलेंटनुसार मोठे रोल मिळाले नाही. सनीच्या म्हणण्यानुसार, बॉबीला त्याची पात्रता होती ते, कधीच मिळाले नाही. नायक म्हणून चांगल्या भूमिका मिळायला हव्या होत्या, असे सनीने म्हटले. सनी म्हणाला की, इंडस्ट्रीत असे अनेक लोक आहेत जे देओल (देओल कुटुंबातील अभिनेते) यांना घाबरतात. सनी देओलने स्वत:बद्दलही बोलला. तो म्हणाला की आम्हा भावांना कधीही योग्य संधी मिळाली नाही. पण तरीही आम्ही नाव कमावले. गदर-2 च्या यशानंतर सनी देओल सध्या क्लाउड नाइनवर आहे. त्याचा गदर-2 हा इतिहासातील तिसरा सर्वाधिक कलेक्शन करणारा हिंदी चित्रपट ठरला आहे. एका मुलाखतीत सनीला एका अशा अभिनेत्याचे नाव विचारण्यात आले ज्याला त्याच्या पात्रतेप्रमाणे यश मिळाले नाही. प्रत्युत्तरात त्याने झूमला सांगितले की, 'मला वाटते की माझ्या धाकट्या भावाला (बॉबी देओल) जेवढे मिळायला हवे होते तेवढे मिळाले नाही. त्याला नायक म्हणून चांगल्या भूमिका मिळायला हव्या होत्या. सनी पुढे म्हणाला, 'मला वाटते की इंडस्ट्रीत बरेच असे लोक आहेत जे देओलना घाबरतात. आम्हाला योग्य संधी मिळाल्या नाहीत. असे असूनही आम्ही आमचा मार्ग शोधतो. गदर-2 च्या यशाने बॉबी खूप खूश असल्याचे सनी देओलचे म्हणणे आहे. त्याला खूप अभिमान वाटत आहे. आम्ही दोघे भाऊ मिळून हा आनंद वाटून घेत आहोत, असे तो म्हणाला.

बॉबी देओलने 1995 मध्ये ट्विंकल खन्नासोबत 'बरसात' चित्रपटातून डेब्यू केला होता. या चित्रपटासाठी बॉबीला पदार्पणातील सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. गुप्त आणि सोल्जर सारख्या चित्रपटांनीही त्याला स्टार बनवले. मात्र, त्यानंतर त्यांच्या कारकिर्दीला उतरती कळा लागली.

# आलियाकडे 557 कोटींची संपत्ती!

आलिया भट्ट गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. तिच्या नवीन चित्रपटाबद्दल नाही तर एका विधानाबद्दल. खरं तर, व्होग मॅगझिनशी झालेल्या संभाषणात आलियाने सहज सांगितले होते की तिचा पती रणबीर कपूर तिला अनेकदा लिपस्टिक पुसण्यास सांगतो. त्याला बायकोची लिपस्टिक आवडत नाही. दहा मिनिटांची क्लिप व्हायरल व्हायला वेळ लागला नाही. रणबीर सोशल मीडियावर ट्रोल होऊ लागला. आलियाची एकूण तीन घरे आहेत. लंडनमध्ये एक आणि मुंबईतील जुहू आणि वांद्र्यात प्रत्येकी एक. आलियाची बहीण शाहीन जुहूच्या घरात राहते. तिने पहिले घर भारतात नाही तर लंडनमध्ये घेतले. एनडीटीव्हीला दिलेल्या मुलाखतीत तिने सांगितले की, 'लंडनमध्ये घर घेण्याचे माझे स्वप्न होते. 2018 मध्ये मी माझे स्वप्न पूर्ण केले याचा मला आनंद आहे. लंडनचा पॉश एरिया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोव्हेंट गार्डनमधील आलियाच्या घराची किंमत 25 कोटी रुपये आहे. कोरोनाच्या काळात 2020 मध्ये आलियाने मुंबईतील वांद्रे येथे एक मोठे घर घेतले. वास्तू पाली हिल्स कॉम्प्लेक्सच्या पाचव्या मजल्यावरील अंदाजे 2500 स्क्वेअर फूटच्या या अपार्टमेंटची किंमत अंदाजे 40 कोटी रुपये आहे. आलियाच्या या नवीन अपार्टमेंटमध्ये सातव्या मजल्यावर रणवीर कपूरचेही घर आहे. शाहरुख खानची पत्नी गौरी खानने आलिया आणि रणवीरच्या घराचेही इंटिरियर डिझाइन केले आहे. अनोखे फर्निचर आणि सुंदर कोटांनी सजलेल्या या घरात शाहीन भट्ट देखील आलियासोबत राहते. तिच्या तीन मांजरीही येथे राहतात. आलिया अनेकदा इंस्टाग्रामवर युरोपियन स्टाईल इंटीरियर आणि आरामदायी सोफ्यांसह लाइव्ह करते. 2.5 कोटी रुपयांच्या आलिशान रेंज रोव्हर वोगपासून ते BMW 7 सिरीजपर्यंत, आलिया भट्टकडे करोडोच्या गाड्यांचा संग्रह आहे. त्याच्याकडे 3 ऑडी आहेत, त्यापैकी दोन SUV आणि एक सेडान AUDI A6 आहे. आलियासोबत रणवीर कपूरच्या कार कलेक्शनचा समावेश केला तर तिच्याकडे जवळपास डझनभर गाड्या आहेत. ही कार 0-7 सेकंदात 0-100 किमी प्रतितास वेग देखील मिळवू शकते. ही कार ६० लाखांची असली तरी ती आलियाची फेव्हरेट आहे. याशिवाय तिच्याकडे काळ्या रंगाची BMW 7-SERIES (730D VARIANT) आहे. या लक्झरी कारची किंमत 1.38 कोटी रुपये आहे. ही 7 सीरीज बीएमडब्ल्यू 250 किमी प्रतितास वेगाने धावू शकते. ते फक्त 6.2 सेकंदात 100 किमी प्रतितास वेग वाढवते. लँड रोव्हर रेंज रोव्हर वोग ही सेलिब्रिटींमध्ये अतिशय लोकप्रिय कार आहे. आलियाचा पती रणवीर कपूर, कतरिना कैफ, अल्लू अर्जुन आणि समंथा यांसारख्या अनेक दिग्गज कलाकारांकडेही ही कार आहे. SUV 3.0 लीटर 6 सिलेंडर इंजिन असलेली ही कार 600 NM चा पीक टॉर्क निर्माण करते. ही कार ताशी 100 किमीचा वेग गाठण्यासाठी 5.5 सेकंदांपेक्षा कमी वेळ घेते. रंगीबेरंगी इंटेरिअर आणि अप्रतिम कलाकृतींनी सुसज्ज असलेली आलियाची व्हॅनिटीही गौरी खानने डिझाइन केली आहे. जीक्यू मॅगझिनच्या एका अहवालात म्हटले आहे की ही बॉलीवूडमधील सर्वोत्तम व्हॅनिटी व्हॅनपैकी एक आहे. त्याच्या आत जुन्या पुस्तकांपासून बनवलेल्या बुक शेल्फ्स आणि कलाकृती ठेवल्या आहेत. आलिया भट्टला बॅगवर स्प्लर्ज करायला आवडते. द इकॉनॉमिक टाईम्सशी संवाद साधताना आलियाने सांगितले की, चित्रपटात येण्यापूर्वी तिने आपल्या पैशाने खरेदी केलेली पहिली महागडी वस्तू लुई व्हिटॉन बॅग होती. आलियाच्या मते, "मी सर्वात जास्त पैसे बॅगवर खर्च करते." वेबसाइटनुसार आलियाकडे हर्मीस केली बॅग आहे, ज्याची किंमत 8.8 लाख रुपये आहे. आलियाकडे सेनिलपासून बनवलेली लाल साइड पॅक बॅग देखील आहे, ज्याची किंमत 5.3 लाख रुपये आहे.



# माझा नवरा बोरींग : राणी



राणी मुखर्जीने नुकतेच पती आदित्य चोप्रासोबतच्या बाँडिंग आणि रिलेशनशिपबद्दल सांगितले. ती म्हणाली की, आदित्य एक बोरींग व्यक्ती आहे, परंतु ती त्याच्या आयुष्यात स्पार्क आणते. राणीने कबूल केले की, तिने प्रसिद्धीपासून दूर राहून तिचे आयुष्य खाजगी ठेवणे पसंत केले. तिचे आणि आदित्य चोप्राचे नाते कसे अधिक सुंदर झाले हे अभिनेत्रीने सांगितले. अभिनेत्रीने तिच्या यशस्वी वैवाहिक जीवनाबद्दल खुलेपणाने माहिती दिली. फिल्म कम्पेनियनला दिलेल्या मुलाखतीत राणी म्हणाली- 'आदित्य आणि माझ्यासाठी सर्वोत्तम वेळ म्हणजे जेव्हा आम्ही एकत्र चित्रपट पाहायला जातो. आम्ही मुंबईतील YRF स्टुडिओमध्ये दर शुक्रवारी चित्रपट पाहतो. 'रांगेत जाऊन उभे राहणे, तिकीट काढणे आणि पॉपकॉर्न घेमे ही खूप मजा असते. आजकाल तुम्हाला पिझ्झा पण मिळतो, मला एकत्र जेवायला आणि चित्रपट बघायला आवडते. 'जेव्हा आम्ही भारताबाहेर असतो तेव्हा आम्ही एकमेकांसोबत वेळ घालवतो. त्याचा हात धरणे असे त्याच्याबरोबर सर्वकाही चांगले वाटते. नात्यात मी आणि आदित्य दोघेही एकमेकांचा आदर करतो. ती म्हणाली की, जर तिने तिचे आत्मचरित्र कधी लिहिले तर त्यात तिच्या लग्नाच्या कथांचा समावेश नक्कीच करेल. लग्नाविषयी बोलताना राणी म्हणाली-'लग्नात सब्यसाचीचा पोशाख परिधान करणारी मी पहिली अधिकृत वधू होते.

# साराभाईच्या टीमचे गेट टुगेदर

अभिनेत्री रुपाली गांगुली नुकतीच टीव्ही मालिका साराभाई VS साराभाईच्या टीमसोबत डिनरसाठी गेली होती. रुपालीने या डिनर डेटशी संबंधित व्हिडिओही सोशल मीडियावर शेअर केला आहे. यावेळी रत्ना पाठक शहा, सतीश शाह आणि राजेश कुमार हे देखील उपस्थित होते. व्हिडिओच्या सुरुवातीला रुपाली एका रेस्तरॉमध्ये शिरताना दिसत आहे. रुपाली रेस्तरॉमध्ये सतीश आणि राजेशला भेटली. यानंतर शोच्या टीमने एकत्र फोटो क्लिक केले. व्हिडिओमध्ये टीम एकत्र जेवण करताना दिसत आहे. व्हिडिओ शेअर करताना रुपालीने लिहिले - काही लोक असे मित्र बनतात की आयुष्यभर त्यांच्यासोबत राहतात. या व्हिडिओवर शोचे चाहते टीमला एकत्र पाहून कमेंट सेक्शनमध्ये आनंद व्यक्त करत आहेत. त्याचवेळी काही लोकांनी व्हिडिओवर असेही लिहिले की, साहील साराभाई म्हणजेच सुमीत या आउटिंगमध्ये का नाही? एका यूजरने लिहिले- हा आजचा इंटरनेटवरील सर्वोत्तम व्हिडिओ आहे!

# जोकोविचचे विजयी पुनरागमन!

## »अमेरिकन टेनिस स्पर्धा : ॲलेक्झांडर मुलरचा पराभव

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**सर्बियाचा २३ ग्रँडस्लॅम विजेता टेनिसपटू नोव्हाक जोकोविचने अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत विजयी पुनरागमन केले. या विजयासह जोकोविच पुढील आठवड्यात नव्याने जाहीर करण्यात येणाऱ्या क्रमवारीत पुन्हा एकदा अव्वल स्थानावर येणार हे निश्चित झाले आहे. करोनाची लस न घेतल्याने जोकोविच गेल्या वर्षी अमेरिकन स्पर्धेत खेळू शकला नव्हता. अमेरिकेतील निर्बंध उठवण्यात आल्यामुळे या वर्षी जोकोविचच्या सहभागाचा मार्ग मोकळा झाला.**

जोकोविचने दमदार पुनरागमन करताना सलामीच्या लढतीत फ्रान्सच्या ॲलेक्झांडर मुलरचा ६-०, ६-२, ६-३ असा सहज पराभव केला. या विजयामुळे जोकोविच पुन्हा जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर येणार आहे. सध्या स्पेनचा कार्लोस अल्कराझ अग्रस्थानावर असून, जोकोविचला पुन्हा अव्वल स्थान मिळवण्यासाठी अमेरिकन स्पर्धेची दुसरी फेरी गाठणे आवश्यक होते. दरम्यान, महिला एकेरीत अमेरिकेच्या कोको गॉफला पहिल्याच फेरीत विजयासाठी संघर्ष करावा लागला.

पात्रता फेरीतून आलेल्या जर्मनीच्या लॉरा सिगमंडने कोकोला तीन सेटपर्यंत झुंजवले. मात्र, कोकोने अखेरीस हा सामना ३-६, ६-२, ६-४ असा




जिंकला. अव्वल मानांकित इगा श्वीऑनटेकने पहिल्या फेरीचा अडथळा सहज पार करताना रेबेका पीटरसनचा ६-०, ६-१ असा पराभव केला. आठव्या मानांकित मारिया सक्कारीला मात्र पहिल्याच फेरीत पराभवाचा सामना करावा लागला.

रेबेका मासारोवाने सक्कारीचे आव्हान ६-४, ६-४ असे संपुष्टात आणले. पुरुष एकेरीत चौथ्या मानांकित होल्गर रुनचे आव्हान पहिल्याच फेरीत संपुष्टात आले.

क्रमवारीत ६३व्या स्थानावर असलेल्या रोबेर्टो कार्बालेस बाएनाने रुनला ६-३, ४-६, ६-३, ६-२ असा पराभवाचा धक्का दिला. तीन वर्षांपूर्वी या स्पर्धेचे विजेतेपद मिळवणाऱ्या डॉमिनिक थिमने २५व्या मानांकित ॲलेक्झांडर बुब्लिकला ६-३, ६-२, ६-४ असे नमवले. थिम २०२१च्या ऑस्ट्रेलियन स्पर्धेनंतर प्रथमच ग्रँडस्लॅम स्पर्धेत खेळत आहे. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा आणि त्यांच्या पत्नी मिशेल ओबामा यांनी सोमवारी अमेरिकन खुल्या स्पर्धेच्या पहिल्या दिवशी आर्थर ॲश कोर्टवर उपस्थिती लावली. ओबामांनी कोको गॉफच्या पहिल्या फेरीच्या लढतीचा आनंद घेतला. लढतीनंतर मिशेल ओबामा यांनी अमेरिकन स्पर्धेच्या समान पुरस्कार पारितोषिक रकमेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षांच्या निमित्ताने बिली जीन किंग यांचा सन्मान केला.

### बराक आणि मिशेल ओबामांची उपस्थिती

» अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा आणि त्यांच्या पत्नी मिशेल ओबामा यांनी सोमवारी अमेरिकन खुल्या स्पर्धेच्या पहिल्या दिवशी आर्थर ॲश कोर्टवर उपस्थिती लावली. ओबामांनी कोको गॉफच्या पहिल्या फेरीच्या लढतीचा आनंद घेतला. लढतीनंतर मिशेल ओबामा यांनी अमेरिकन स्पर्धेच्या समान पुरस्कार पारितोषिक रकमेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षांच्या निमित्ताने बिली जीन किंग यांचा सन्मान केला.

# भारत-पाकिस्तान सामन्याची क्रेझ!

## » विश्वचषक 2023 च्या तिकिटांची विक्री सुरू

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**आयसीसी विश्वचषक २०२३ च्या तिकिटांची विक्री सुरू झाली आहे. वर्ल्ड कप २०२३ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना १४ ऑक्टोबर रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्याबाबत चाहत्यांमध्ये नेहमीच एक वेगळीच उत्सुकता असते. या सामन्याची सर्व तिकिटे अवघ्या एका तासात विकली गेली.**

यंदा विश्वचषक भारतात होत असल्याने प्रत्येक भारतीय चाहत्याला पाकिस्तानविरुद्ध स्टेडियममध्ये तिरंगा फडकवायचा आहे. कदाचित त्यामुळेच भारत-पाकिस्तान सामन्याबाबत चाहत्यांमध्ये वेगळाच उत्साह आहे. भारत-पाकिस्तान सामन्याच्या पहिल्या खेपेची तिकिटे तासाभरात विकली गेल्याने याचे वैशिष्ट्य दिसून आले. बुक माय शो, आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी) च्या तिकीट भागीदाराने भारत-पाकिस्तान सामन्याची तिकिटे ऑनलाइन विक्रीसाठी ठेवली होती.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील या सामन्याच्या तिकिटांची दुसरी खेप ३ सप्टेंबर रोजी विक्रीसाठी ठेवण्यात येणार आहे.

ही तिकिटेही काही तासांतच विकली जाण्याची शक्यता आहे. भारताचे सामने आणि सराव सामन्यांसाठी किती तिकिटे ऑनलाइन विक्रीसाठी ठेवली गेली याची पुष्टी होऊ शकली नाही, परंतु असे कळते की विक्री २९ ऑगस्ट २०२३ रोजी संध्याकाळी ६ वाजता सुरू झाली आणि सर्व तिकिटे एका तासात विकली गेली.

वृत्तसंस्था पीटीआयने भारतीय क्रिकेट नियामक मंडळाशी (बीसीसीआय) संबंधित सूत्रांच्या हवाल्याने सांगितले की, 'भारत-पाकिस्तान सामन्याची तिकिटे २९ ऑगस्ट रोजी केवळ मास्टरकार्ड असलेल्या चाहत्यांसाठी विक्रीसाठी ठेवण्यात आली होती. एका व्यक्तीला फक्त दोन तिकिटे खरेदी करता आली आणि भारत-पाकिस्तान सामन्याची सर्व तिकिटे विक्री सुरू झाल्याच्या तासाभरात विकली गेली. तिकीट विक्रीची पुढील फेरी ३ सप्टेंबर रोजी होण्याची शक्यता आहे.




### सोशल मीडियावर व्यक्त केला संताप

» दरम्यान, आयसीसीचा तिकीट भागीदार बुक माय शोच्या खराब सेवेबद्दल क्रिकेट चाहत्यांनी सोशल मीडियावर टीका केली आहे. वृत्तांवर विश्वास ठेवला तर, तिकीट विक्री थेट सुरू झाल्याच्या काही मिनिटांतच, बुक माय शोची वेबसाइट क्रॅश झाली. यानंतरही चाहत्यांना आभासी रांगेत उभे असल्याचे दाखवण्यात आले. काही सेकंद गेले असतील की प्रतीक्षा वेळ वेगाने वाढला. बुक माय शो वेबसाइटने चाहत्यांना ६ तासांपेक्षा जास्त काळ संयमाने वाट पाहण्यास सांगितले, तर सर्व तिकिटे एका तासात विकली गेली.

# बाबर आझमने रचला इतिहास!

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आशिया कपच्या पहिल्याच सामन्यात पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमने धडाकेबाज शतक झळकावले. बाबरने नेपाळविरुद्ध जबरदस्त फलंदाजी केली. त्याने त्याच्या एकदिवसीय कारकिर्दीतील १९ वे शतक झळकावले. बाबरने १५१ धावा केल्या. त्याने १३१ चेंडूंच्या खेळीत १४ चौकार आणि चार षटकार मारले. त्याने शतक झळकावून अनेक विक्रम केले आहेत. विशेष म्हणजे त्याने ब्रायन लाराच्या एक खास विक्रमाशी बरोबरी केली.

एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद १९ शतके करणारा तो खेळाडू ठरला. या प्रकरणात बाबरने दक्षिण आफ्रिकेचा माजी अनुभवी सलामीवीर हाशिम आमला आणि भारताचा अनुभवी फलंदाज विराट कोहली यांना मागे टाकले आहे. बाबरने कारकिर्दीतील १०२ व्या डावात १९वे शतक झळकावले. अमलाने यासाठी १०४ डाव खेळले होते. कोहलीने १९ शतकांसाठी १२४ डाव खेळले होते. त्याचवेळी ऑस्ट्रेलियाचा सलामीवीर डेव्हिड वॉर्नरने १३९ डावात ही कामगिरी केली. एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके झळकावण्याच्या बाबतीत बाबरने वेस्ट इंडिजचा माजी कर्णधार ब्रायन लारा, श्रीलंकेचा माजी कर्णधार महेला जयवर्धने आणि डेव्हिड वॉर्नर यांच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे.

या सर्वांच्या नावावर एकदिवसीय क्रिकेटमध्ये १९-१९ शतके आहेत. जयवर्धनेने ४४८, ब्रायन लाराने २९९ आणि डेव्हिड वॉर्नरने १४२ सामन्यात १९ शतके झळकावली. त्याचवेळी बाबरने केवळ १०४ एकदिवसीय सामन्यांमध्ये त्याची बरो सर्वाधिक शतके झळकावण्याच्या बाबतीत बाबरने न्यूझीलंडचा सलामीवीर मार्टिन गप्टिल आणि माजी ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू मार्क वॉ यांना मागे टाकले. मार्क वॉने २४४ आणि गुप्टिलने १९८ सामन्यात १८-१८ शतके झळकावली आहेत.